# करवीरची अंबाबाई का महालक्ष्मी ?




**मूळ मूर्तीचे छायाचित्र**

भारतात हिंदू धर्मात द्वादश शक्तीपीठे आहेत त्यातील एक शक्तीपीठ म्हणजे करवीर क्षेत्राची 'अंबाबाई' ही होय. हिचे वाहन सिंह आहे. तिथे श्रीचक्र, चौसष्ट योगिनी व मातृलिंग आहे. मंदिरातील दोन्ही मूर्ती (सरस्वती व काली) याही दूर्गा, महिषासूर मर्दिनीच्या मूर्ती आहेत. ***ही तिरूपती बालाजीची पत्नी पद्मावती ही भक्तांची दिशाभूल आहे.***

***– डॉ. सुभाष के. देसाई***
*M.A. Ph.D.*

# करवीरची अंबाबाई का महालक्ष्मी ? एक सत्यशोधन....

२०१४ च्या नवरात्रीपूर्वी आम्ही एक छोटी पुस्तिका प्रसिद्ध केली. समाजप्रबोधनार्थ प्रकाशित केलेल्या या पुस्तिकेचे स्वागत समाजातील सर्व थरातून झाले. प्रसारमाध्यमे, शेतकरी कामगार पक्ष, संभाजी ब्रिगेड, भारतीय कम्युनिस्ट पार्टी अशा राजकीय पक्षांनी आणि श्रीअंबाबाईच्या लाखो भक्तांनी त्याबद्दल आमचे अभिनंदन केले. एक धर्मचिकित्सा सुरू झाली. जाणीवपूर्वक शिवपत्नीला विष्णुपत्नी करण्याची चूक दुरूस्त झाली ही श्रीअंबेचीच इच्छा ! आता तिरूपतीहून येणारा शालू पत्नी म्हणून नव्हे तर मातृभावनेतून स्विकारला जाण्याचे जाहीर झाले हे ऐतिहासिक परिवर्तन झाले. ते खिलाडूवृत्तीने व कायमस्वरूपी स्विकारावे ही भक्तांची अपेक्षा. 'काली आणि सरस्वती' याबाबतचे ढोंगाचे मुखवटे गळून पडण्याची अपेक्षा आहे. व्यसनी पुजाऱ्यांनी मंदिराचे पावित्र्य बिघडवू नये. सरस्वतीची मूर्ती ही शारदेची नसून दूर्गेची आहे. काली ही महिषासूराची जीभ ओढणारी महिषासूरमर्दिनी आहे. हे सत्य भक्तांसमोर पुजाऱ्यांनीच जाहीर करावे. अन्यथा त्याचे मूळ फोटो प्रसिद्ध करावे लागतील. या दोन्ही मूर्तींना कधीही स्नान घातले जात नाही. मुखवटे काढले तर सत्य बाहेर येईल ही भीती कशाला ? मुखवट्यामागे हजारो झुरळे लपतात हे काय पुजाऱ्यांना माहीत नाही ? श्रीअंबेला विष्णुपत्नी केले तसाच हा निर्लज्जपणा आहे.

## मंदिराचा ऐतिहासिक आढावा –

सर्वसामान्य भक्तांना लक्ष्मी, महालक्ष्मी, दूर्गा, तुळजाभवानी, काली, सरस्वती, कात्यायनी, त्र्यंबोली या साऱ्या देवता एकाच जगदंबेची रूपे वाटतात आणि त्यात काही गैरही नाही. परंतु त्या श्रद्धेचा खेळखंडोबा करणे, भक्तांची दिशाभूल करणे हे पाप आहे, धार्मिक व नैतिक गुन्हा आहे.

करवीर या क्षेत्रावर विविध धार्मिक, सांस्कृतिक परंपरांनी राज्य केले आहे. अनेक वेळा मूर्ती, मंदिरे यात बदल झाले आहेत. त्यामुळे बुद्ध, जैन, हिंदू धर्माचे प्राबल्य वेगवेगळ्या कालखंडात दिसून येते. किंबहुना हे तिन्ही धर्म ख्रिस्तपूर्व काळात स्वतंत्र नव्हते. ते एक सांस्कृतिक अभिसरण होते.

प्राचीन शिलालेखांचा अभ्यास केलेल्या प्रा. ग. ह. खरे, प. स. देसाई, अ. ब. करवीरकर यांची मते अभ्यासपूर्ण आहेत. ११-१२ व्या शतकातील शिलाहार राजांचे शिलालेखात असा संदर्भ मिळतो की, या करवीर निवासिनी देवीने मस्तकावर लिंग

धारण केले आहे. दुसरा शिलालेख राजा भोजने पूजा, नैवेद्यासाठी कोपरवाड गावातील जमिन दिल्याचा उल्लेख आहे. काही शिलालेखात 'महालक्ष्मी' असा आलेला उल्लेख विद्यमान मूर्तीचा नसावा. त्याचप्रमाणे कल्याणचा चालुक्य राजा, देवगिरीचे यादव यांनीही मंदिरासाठी जमिन, जागा दान केल्याचा संदर्भ आहे. अलिकडच्या काळात या मंदिराची व्यवस्था श्री. प्रधान वहिवाटदार यांचेकडे होती. मध्यंतरीच्या काही बदलांची नोंदही उपलब्ध आहे. १९६९ साली महाराष्ट्र शासनाने प.ट्र.र. कलमाने पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीची स्थापना केली. गॅझेट २ मे, १९६९ डिक्लरेशन १५ मे, १९६९ या समितीकडे मंदिराच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. भक्तांनी देवीला अर्पण करावयाच्या सर्व वस्तू या समितीकडे देऊन रितसर पावती घ्यावी. पुजाऱ्यांच्याकडे देवीसाठी अर्पण केलेल्या दानाचा भक्तासाठी काहीही परतफेड होत नाही. ती त्यांची खासगी मालमत्ता बनते. त्यामुळे मंदिराच्या उंबऱ्याच्या आत काही दान न ठेवता ते सरकारी दान पेटीत टाकावे.

१९१८ च्या दरम्यान अपघाताने किंवा जाणीवपूर्वक मूर्तीच्या मस्तकावरील साडेतीन वेटोळ्याची नाग फणी आणि शिवपिंड भंगली. त्यानंतर १९५५ साली मूर्तीवर वज्रलेप करण्यात आला. (१६ जाने. ते ३१ जाने. १९५५) त्यावेळी सप्तशती पाठ व श्रीसूक्त आवर्तने, श्री यंत्राची षोडषोपचार पूजा दि. २५/२/५५ रोजी झाली. पुन्हा २०१४ मध्ये वज्रलेपाचा वाद सुरू झाला आहे.

या मूर्तीचा भंगलेला हात चांदीचा पत्रा व तारांनी कमरपट्यांनी बांधून ठेवला होता. सध्या त्याचे मूळचे सौंदर्य हरवले आहे व तो हात बोजड बनला आहे. या मंदिराचे बांधकाम हेमाडपंथी, भव्य सुबक व निळसर काळ्या पाषाणात सर्वतोभद्र चक्राकार आहे. मूर्तीचे गर्भागृह ३० X २० फुट रूंद आहे. मूर्तीच्या मागे एक व दोन्ही बाजूस दोन अशा ८ X १० फुटाच्या तीन खोल्या आहेत. पाठीमागच्या खोलीत पुजारी आपले व भक्तांनी दान केलेले दागिने, साड्या ठेवतात. तेथे कोणालाही प्रवेश दिला जात नाही. उजव्या खोलीत देवीचे स्नानाचे पाणी, तिर्थ ठेवतात. त्यासमोर तिर्थासाठी गोमुख आहे. त्याचे खाली ३ X ३ फुटाचे कुंड आहे. त्या कुंडात पाणी पडते व तेथून अंतर्गत मार्गातून मणिकर्णिकेत सोडले जाते. मध्यंतरी एका पुजाऱ्याने या कुंडात लघुशंका केल्याची वदंता पसरली होती. त्यामुळे भक्तांच्यात फार मोठी असंतोषाची लाट पसरली होती. तर देवीला भक्ताने अर्पण केलेले सोन्याचे डोळे चोरल्याचा कोणा पुजाऱ्यावर गुन्हाही दाखल झाला होता. हे शक्तिपीठ असल्याने महाराष्ट्रातील ब्राह्मण पुजारी तयार झाले नाहीत म्हणून आंध्र (तेलंगणा) येथून मुकुंदस्वामी महामुनी हे आले. त्यांचे वारस मुनिश्वर. पुजाऱ्यात काहींना कन्यावारसाने पुजेत वाटा

मिळाला. श्रीपूजेचे हक्क सनदा कधी जाहीर केलेल्या नाहीत. त्या होण्याची गरज आहे. म्हणजे त्यातला खरेखोटेपणा उघड होईल. आता राज्य शासनाने वटहुकुमाद्वारे पंढरपूर श्रीविठ्ठलमंदिर जसे बडव्यांच्या कैदेतून मुक्त केले तसे श्रीअंबाबाईचे मंदिर पुजाऱ्यांच्या कैदेतून मुक्त व्हायला हवे तरच भक्तांच्या कोट्यावधी रूपयांचा विकासकामासाठी उपयोग होईल आणि उत्पन्नही वाढेल.

श्रीचक्रामागच्या दगडी जिन्याने माडीवर गेले असता समोर नंदी असून श्रीअंबाबाईच्या मस्तकावर शिवाची उत्तराभिमुख पिंड आहे याला 'मातुलिंग' म्हणतात. (महालक्ष्मीच्या मस्तकावर कधी शिवपिंड असते ?) ती अंबाबाई, महादेवी आहे म्हणूनच शिवपिंड आहे. त्यामुळेच शारदीय नवरात्रात अष्टमीचे जागर व घटस्थापना व होमहवन होत असते. ती विष्णुपत्नी नाही शिवपत्नी आहे याला आणखी कोणता पुरावा हवा ?

शक्तिरूपात प्रगट होऊन कोल्हासुरासारख्या राक्षसांचा वध केला म्हणून ती जगाची आई 'जगत् अंबा म्हणजेच अंबाबाई' बनली. तिच्या गळ्यातील कवड्यांची माळ, पंचमीचा कोहळा फोडण्याचा विधी, अष्टमीची पूजा, सप्तशतीचे पाठ, यज्ञ, विजयादशमीचा सोहळा, नायकिणीसह, लव्याजम्यासह निघणारी पालखी हे सर्व विधी तांत्रिक आणि शक्तिपीठाचे आहेत. राजा दक्षाचा शिरच्छेद करून त्याच्या धडावर मेंढ्याचे शीर शंकराने लावले ती मेंढ्याची शिळाही आहे. या देवीचा मूळ प्रसाद शुक्रवारचे फुटाणे आहे.

यापुढे मराठमोळ्या महाराष्ट्रीय धार्मिक सांस्कृतिक परंपरेवर आंध्र संस्कृतिचे अतिक्रमण करवीरवासियांनी थांबवायला हवे. उदा. लाडू प्रसाद, तिरूपती-पद्मावती विवाह सोहळा, शालूची मिरवणूक, अपॉईंमेंटद्वारे दर्शन, रेल्वेचे हरिप्रिया नाव आणि कॅलेंडरपासून दुकानाच्या, रस्त्यावरच्या बोर्डावरील नावे अंबाबाई अशीच करावीत. या गोष्टींचा अभ्यास नसल्याने १९८२ साली पश्चिम महाराष्ट्र देवस्थान कमेटिच्या अतिउत्साही सदस्यांनी तिरूपती देवस्थानाला ही लक्ष्मी आहे विष्णुपत्नी आहे. त्यामुळे दसऱ्याला साडी पाठवा अशी विनंती केली. पडत्या फळाची आज्ञा म्हणून साडी येऊ लागली.

## चौसष्ट योगिनी पूजा काय दर्शविते ?

मी नर्मदा परिभ्रमाणाच्यावेळी जबलपूरजवळ भेडाघाट व खजुराहो येथिल चौसष्ट योगिनींची मंदिरे पाहिली आहेत. योगिनींच्या उपासनेचा संप्रदाय हा 'योगिनी कौल संप्रदाय' म्हणून ओळखला जातो व त्यांचा संबंध मच्छिंद्रनाथांशी जोडला जातो. करवीर क्षेत्री (सध्याच्या शालिनी पॅलेसच्या जागी) कानफाट्या नाथांचा मठ होता. ते

रंकभैरवाचे दर्शन घेऊन महाद्वारातून येऊन श्रीअंबाबाईचे दर्शन घेत असत. नवरात्रीपूर्वी करवीर क्षेत्री चौसष्ट योगिनींची पूजा आजही केली जाते.

गोंधळ हा पूजा, लोकगीताची पद्धत दूर्गा, तुळजाभवानी या देवतांच्यासाठीच केली जाते. गोंधळात गाताना ते म्हणतात –

*'इकडे अंबेच्या दळी । औटकोटी भूतावळी । नवकोटी चामुंडा सकळी ।*
*चौसष्ट कोटी योगिनी । वेताळ भैरव अपार । तेहतीस कोटी दवभार ।*
*दिवट्या घेऊन समग्र । गोंधळ घालिती अंबेपुढे ।। उदो..उदो...*

## श्रीचक्र उपासना :

या शिव-शक्ति उपासनेत जसे शत्रूपासून संरक्षण भक्तांना मिळते तसे श्रीचक्रउपासनेतून घरी-दारी, सुख-समृद्धी नांदते. हे श्रीचक्र प्रत्येक शक्तिपीठात असते. बदामीची बनशंकरी, करवीरची अंबाबाई या ठिकाणी आहे. या पूजेसाठी श्रीसुक्त, सौंदर्यलहरी, त्रिशती उपासना होत असते, कुंकुम, बिल्व, कमळ, दीप, धूप, दीपानी पूजा होते. पौर्णिमेला पंचामृताचा अभिषेकही केला जातो. करवीरच्या श्रीअंबाबाई मंदिरातील उत्तरेच्या छोट्या खोलीतील श्रीचक्राचे दर्शन भक्त आवर्जून घेतात. (त्यावरचा महालक्ष्मी यंत्र हा फलक हटवावा).

## श्रीदूर्गासप्ती पाठ

श्रीअंबाबाई म्हणजे दूर्गेची पूजा, तिचे वर्णन, स्तूती, चंडमुंड राक्षसांचा वध, तिच्या उपासनेचे फळ यासाठी सप्तशतीचे पूर्ण पाठ केले जातात किंवा देवीकवच, नवार्णव व ॐ ऐं ऱ्हीं क्लीं चांमुडायै विच्चे हा नर्वाणव मंत्र नित्य केला जातो.

त्यामुळे यापुढे श्रीअंबाबाईची महाराष्ट्र संस्कृतिच्या मूळ पद्धतीने पूजा, उपासना श्रद्धेने करावी. विशिष्ठ वर्ग स्वतःच्या फायद्यासाठी, पैसा मिळवण्याचा धंदा करण्यासाठी करतो त्याचा निषेध करावा. त्याचा जाब विचारावा. देवीचे वाहन 'सिंहाचे दर्शन' साऱ्यांना व्हावे. तो लपवण्याचा प्रयत्नच अधार्मिक, अनैतिक आहे. मद्य, गुटखा प्राशन करणाऱ्या पुजाऱ्यांना पोलिसांच्या ताब्यात द्या. ब्राह्मणधर्माला अशोभनीय अशा आचरणामुळे काही पुजाऱ्यांची अवस्था संत रामदासांनी म्हटल्याप्रमाणे झाली आहे –

आमुची वंशवेल का खुंटिली । हा हा देवा वृत्ती बुडाली । कुलस्वामीण कां क्षोभली । विझला कुलदीप । केली नाना कवटाले । पुत्रलोभे केली ढाले । तरी अदृष्य फिरले । पुत्र नाही । आम्हाच द्रव्य काये करावे । ते जावे परी अपत्य व्हावे अपत्यालागी त्यजावे । लागले सर्व ।। *– (श्रीदासबोध 'सत्वगुण परीक्षा (ब) )*

यामुळेच जावायाला **या गोरख धंद्यात भागीदार** करावे लागले. धर्माचा धंदा तेजीत चालण्यासाठी असंख्य कथा, पुराणकथा लिहायच्या, त्या चोपड्या प्रसिद्ध करायच्या, प्रसारित करायच्या हा व्यवसायाचा भाग आहे. नरकाची भीती घालायची, शापाची भीती घालायची हे धंदे आता बंद व्हावेत. देवीला साडी-चोळी कोण मागते ? देवीला दागिना अर्पण करणाऱ्या भक्ताला माहित नसते की त्याच सायंकाळी तो दागिना पुजाऱ्याच्या बायकोच्या गळ्यात असू शकतो. मग भक्तांनी विचार करावा देवीला श्रद्धेने अर्पण केलेला लाखो रूपयांच्या साड्या, दागिने कोठे जातात ? त्या विकल्या जातात. अनेक दुकानदारांकडे जातात. दरवर्षी तीन/चार किलो सोन्याचे, चांदीचे दागिने कोठे जातात ? काळ्या बाजारात विकले जातात. हे काळे धन जमा करणे तेही धर्माच्या, देवीच्या नावावर ! म्हणजे हा धर्मद्रोह झाला, राष्ट्रद्रोह झाला, सरकारची, आयकर विभागाची फसवणूक झाली. काळेधन बाहेर काढणाऱ्या 'भाजप सरकारवर मोठी जबाबदारी पडली आहे. धर्माच्या नावावरचे काळेधन त्यांनी बाहेर काढावे.'

अप्रत्यक्षपणे गोर-गरीब, श्रीमंत, सुशिक्षित-अशिक्षित सारेच या काळ्या धंद्याला प्रोत्साहन देतात. यापुढे देवीला साडी-चोळी, खण-नारळ, प्रसाद, अगरबत्या, सोन्या-चांदीचे दागिने द्यायचे बंद करावे. घरच्या मोलकरणीला साडी दिलीत तर पुण्यकर्म होईल. धर्माच्या नावावरची देवळात चाललेली ही दुकाने बंद करण्याचे सामर्थ्य तुम्हा-आम्हात आहे फक्त त्याची सुरूवात करा. संतांनी म्हटल्याप्रमाणे नवसाने पोरे-बाळे होत असती तर पती का केला असता ? नवस करता कशासाठी ? ग्रह दोष, वास्तु दोष त्यासाठी ग्रहशांती, वास्तुशांती होत नसून ती पुजाऱ्यांची पोट शांती, तिजोरी शांती होत असते. त्यामुळे यापुढे प्राचिन मंदिर, नवसाला पावणारा देव/देवी नागबळी, कालसर्पयोग या गोष्टींवर पुराण कथावर मुळीच विश्वास ठेवू नका. एक प्रकारच्या मानसिक गुलामगिरीतून स्वतःची निश्चयाने मुक्तता करा.

## रा. चिं. ढेरेंचे अंबाबाईबाबतचे बोगस संशोधन

श्री. रामचंद्र चिंतामण ढेरे यांनी पंढरपूरच्या श्रीविठ्ठल आणि तुळजापूरच्या श्रीतुळजाभवानी या महाराष्ट्राच्या आराध्य दैवताबद्दल अभ्यासपूर्व ग्रंथ लिहिले आहेत. त्याबद्दल त्यांना धन्यवाद द्यायला हवेत. परंतु त्यांनी करवीरनिवासिनी श्रीअंबाबाई बाबत मांडलेली मते अन्‌अभ्यासी, घाईघाईतली आहेत हे निर्विवाद. कदाचित त्यांना वेळ देता आला नसेल पण त्यामुळे लाखो भक्तांची दिशाभूल व्हायला या विद्वानांची मते कारणीभूत ठरली आहेत. श्रीतुळजाभवानी या ग्रंथात त्यांनी पान नं. १३ वर करवीरच्या अंबाबाईचा फोटो रंगीत छापला आहे. तो मूळ मूर्तीचा नसून डिजिटल

मिक्सिंगने फोटोग्राफरनी बनवलेले काल्पनिक चित्र आहे. श्री. रा. चि. ढेरे यांनी हे कसले संशोधन केले आहे ? त्यातील समया, मखर कृत्रिम आहे. देवीच्या उजव्या हातातील गदा नि डाव्या हातातील ढाल कोठे आहे ? शिवाय ही सिंहवाहिनी महादेवी, दूर्गा ! तिचा डाव्या बाजूला दिसणारा सिंह कोठे आहे ? हे प्रश्न ढेरेंना का भेडसावले नाहीत ?

ढेरेंच्यासारखा संशोधकानेही शिवप्रियेला हरिप्रिया बनवावे हे जसे दुर्दैव तसेच ***''रूसलेल्या बायकांच्या दादल्यांचा विषय लोक दैवतांच्या अभ्यासक्षेत्रात मोठा रोचक आहे. करवीर क्षेत्राची अधिष्ठात्री देवी ही गिरीच्या व्यंकटेशावर रूसून आलेली पद्मावतीच आहे.''*** हे विधान करणे हे निषेधार्थ बनले आहे. ढेरेंनी यापुढे मारलेली मजल तर त्यांच्या संशोधनाचे तीन तेरा वाजवते. पान नं. २३ वर ते म्हणतात, ***''त्या रूसलेल्या बायकांचा अनुनय करणारे 'प्रिया शरण नायक' स्थल पुराणात आपल्याला भेटत राहतात. गिरीचा व्यंकटेश दर प्रतिवर्षी महालक्ष्मीला महागातली साडी भेट म्हणून पाठवीत असतो. त्याचा प्रियानुनय ध्यानी घेऊनच, व्यंकटेश–महालक्ष्मीच्या नात्यातले हे नाजुक सौंदर्य हळुवारपणे सांभाळूनच आमच्या केंद्रीय रेल विभागाने कोल्हापूर–तिरूपती या मार्गावरील गाडीला नाव दिले आहे हरिप्रिया.''***

आता या बोगस संशोधनाबद्दल ढेरेंना शासनाने एखादा पुरस्कारच द्यायला हवा. कांचिकामकोठीच्या दिवंगत शंकराचार्य चंद्रशेखर सरस्वती, करवीरचे विद्यमान शंकराचार्य, देवस्थान कमेटी, तिरूपती ट्रस्ट आणि अंबाबाईचे कोट्यावधी भक्त ही देवी शिवप्रिया महादेवी, पार्वती, दूर्गेचे रूप आहे हे ठामपणे सांगत असताना ढेरेंनी आपल्या श्रीतुळजाभवानी या ग्रंथातील बनावट फोटो नि चुकीची विधाने काढून टाकणे हे खऱ्या संशोधनवृत्तीला साजेसे ठरेल.

## बोलक्या प्रतिक्रिया

१. २००३ मध्ये करवीरपीठ शंकराचार्यांनी एका पुस्तकाला आशीर्वाद देताना महालक्ष्मी उल्लेख केला पण त्यांनी आता त्यात बदल केला आहे. ते म्हणतात, **देवीचे खरे नाव अंबाबाई**. आम्ही 'अंबाबाई' म्हणूनच संबोधतो. कालानुरूप व कार्यानुरूप आदिमायेने २१ प्रकारची रूपे घेतल्याचा उल्लेख 'सप्तशती'त आहे. काही रूपे सौम्य व काही उग्र आहेत. देवीचे कोल्हापुरातील रूप सौम्य आहे. तर देवी तुळजाभवानी उग्र स्वरूपाची आहे. देवीने घेतलेल्या २१ रूपांतील पहिले रूप लक्ष्मीचे सगळ्याच देवता या आदिमायेचे रूप असल्याने हा वाद उत्पन्न होऊ नये.

– ***विद्यानृसिंह भारती*** (शंकराचार्य, करवीर पीठ)

२. **शालुचा स्वीकार मातृभावनेतून :** मी देवस्थानच्या सचिवपदाचा कार्यभार घेतल्यापासून म्हणजे गेल्या दोन वर्षात आम्ही कुठेही श्री देवीची 'पत्नी' असा उल्लेख केलेला नाही. देवीचा इतिहास पुन्हा प्रकाशित झाला. या मंदिराचा आणि कोल्हापूरचा विकास स्वतंत्र शक्तिपीठ म्हणून करण्याचाच आमचा प्रयत्न असेल. यापुढे शालूचा स्वीकार मातृभावनेतून केला जाईल.

– ***संजय पवार*** (सचिव, पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती)

३. **विकास कोणत्या अर्थाने ? :** काहीजण या देवतेला विष्णुपत्नी, तर काहीजण पार्वती म्हणतात. मूर्तिवर्णनानुसार ही देवी विष्णुपत्नी नव्हे. कारण देवीचा मत्स्यकंद व पद्मपुराणात उल्लेख असून, या क्षेत्राला 'औटपीठ' असेही म्हणतात. मंदिराचा तिरूपतीच्या धर्तीवर विकास व्हावा, यामागील उद्देश असा की, तेथे गेल्यानंतर भक्तांना मिळणाऱ्या सोयी-सुविधा, स्वच्छता, प्रसादाची गुणवत्ता अशा चांगल्या सुविधा येथेही भाविकांनाही मिळाव्यात.

– ***राजू मेवेकरी*** (अध्यक्ष, महालक्ष्मी अन्नछत्र सेवा ट्रस्ट)

४. **मूर्ती हाच खरा पुरावा :** महालक्ष्मी कमळात असते. तिच्या हातून धनाचा वर्षाव होतो. पार्वतीच्या हातात त्रिशूळ असतो. महाकाली तमोगुणी देवता असल्याने उग्र स्वरूपाची असते. सरस्वती सत्वगुणी. मात्र, या सर्व देवतांपैकी एकाही देवतेच्या मूर्तीच्या वर्णनानुसार मूर्ती नाही. ही देवी अन्य कोणत्याही देवतेचे रूप नाही. तर ती जगत्जननी आहे. अशी मूर्ती फक्त कोल्हापूरातच घडविली जावी, असा नियम हेमाद्रीने लिहिलेल्या ग्रंथात आहे.

– ***उमाकांत राणिंगा*** (मूर्ती अभ्यासक)

५. **अशीही एक आठवण :** ज्येष्ठ पत्रकार आप्पासाहेब शिंदे यांनी या घटनेची एक आठवण सांगितली. त्यावेळी देवस्थान समितीचे खजानीस डफळे हे तिरूपतीहून साडी घेऊन आल्यानंतर बैठक ठेवण्यात आली होती. यावेळी डफळे यांनी अंबाबाईला पत्नी म्हणून तिरूपती देवस्थानने ही साडी दिल्याचे सांगताच डी. डी. शिंदे सरकार उठले आणि म्हणाले, 'काय विष्णूपत्नी म्हणतोयंस ? आई म्हणून कोण साडी देऊ शकत नाही का ?'

६. **इतिहासाची चुकीची मांडणी :** 'करवीर महात्म्या'तील उल्लेखानुसार ही देवी आदिशक्ती असून, कुणाचीही पत्नी नाही. शिवस्वरूपीणी, विष्णूस्वरूपीणी, अशी सर्व रूपे या देवीमध्ये आहेत. लक्ष्मी या देवीच्या हृदयात विलीन झाली. मात्र अज्ञानातून आणि मार्केटिंगसाठी मंदिराचा इतिहास चुकीच्या पद्धतीने मांडला जात आहे.

– ***अजित ठाणेकर*** (श्रीपूजक)

७. **दिशादर्शकावर 'अंबाबाई' असा उल्लेख करा :** 'करवीर महात्म्य' ज्यांनी लिहिले, त्या ग. गो. पतकी यांचा मी वंशज. या देवीचे खरे स्वरूप 'अंबाबाई' असे आहे. त्यामुळे कोल्हापूर शहरात ठिकठिकाणी लागलेले डिजिटल, दिशादर्शक फलक किंवा बोर्ड यावर 'महालक्ष्मी' ऐवजी 'अंबाबाई' मंदिर असा उल्लेख केला गेला पाहिजे.

– ***रामेश्वर पतकी***

८. **अंधानुकरण नकोच :** तिरूपीत देवस्थानने त्या काळी अंबाबाईसह अन्य शक्तिपीठांनाही साडी पाठविली होती. नंतर देवस्थान समितीनेच ही पद्धत सुरू केली. माझ्या काळात सखारामबापूंनी 'तुम्ही काय ही महालक्ष्मी म्हणून नवीन पद्धत सुरू केली ? ही देवी अंबाबाई आहे', असे सांगून मला मंदिराच्या दरवाजावर 'अंबाबाई' असा फलक लावायला लावला होता. अशी खरी माहिती सांगणारी अनेक मंडळी आजही आहेत. उद्या तिरूपतीप्रमाणेच मंद प्रकाशात देवीचे दर्शन घडवा, असे सांगितले गेले तर तेही आपण मान्य करू का ? देवीची महाराष्ट्रीयरूप अबाधित राखले गेले पाहिजे. केवळ मार्केटिंगसाठी अन्य देवस्थानांचे अंधानुकरण केले जाऊ नये.

– ***ॲड. गुलाबराव घोरपडे*** (माजी अध्यक्ष, पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती)

९. **तिरूपती देवस्थानला कळविणार :** मी श्रीशैलला गेलो होतो. तेथे सर्व शक्तिपीठांची माहिती व फोटो लावण्यात आले आहेत. या ठिकाणीही कोल्हापूरच्या अंबाबाईचे शक्तिपीठांत पाचव्या क्रमांकावर स्थान आहे. तिरूपती देवस्थानाला व तेथील अधिकाऱ्यांना या सगळ्या इतिहासाची माहिती देण्यात येईल.

– ***रामाराव*** (समन्वयक, तिरूपती देवस्थान)

१०. **शंकराचार्य चंद्रशेखर सरस्वतींची आठवण :** त्यांना मी भेटायला गेलो तेव्हा त्यांनी मला विचारले, 'देवीच्या दर्शनाला जाता का ?'' मी म्हणालो, ''हो ! महालक्ष्मी मंदिरात जातो.'' तेव्हा ते म्हणाले, ''ती पार्वती अहे. तिच्या मस्तकावर शिवलिंग आहे. ती महालक्ष्मी नव्हे.'' त्यावेळी मला आठवले की 'लहानपणापासून आपण अंबाबाईला जातो असेच म्हणत होतो'.

– ***यशवंतराव थोरात*** (माजी अध्यक्ष, नाबार्ड)

भारतामध्ये शैव आणि वैष्णव म्हणजे 'शिव-पार्वती' आणि 'विष्णू-लक्ष्मी' यांना उपास्य दैवत मानणारे हे दोन मोठे संप्रदाय आहेत. शिव-पार्वती ही सर्वसाधारणपणे बहुजन समाजाच दैवते होत आणि वरील सर्वशक्तीपीठे ही दुर्गेची, पार्वतीची रूपे आहेत. अनेक राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक बदलांमुळे सांस्कृतिक

अभिसरणामुळे, परकीय आक्रमाणांमुळे अनेक मंदिरांचा ताबा वेगवेगळ्या धार्मिक आणि सांप्रदायिक लोकांनी घेतला. बद्रीनाथचे मंदिर किंवा जगन्नाथपुरीचे मंदीर ही प्राचिन काळी बुद्ध धर्मियांची पूजास्थाने होती. असे इतिहास संशोधकांचे मत आहे. महाराष्ट्रातील लेण्याद्रिपर्वतामध्ये असणाऱ्या तेवीस गुंफा या बुद्ध गुंफा आहेत हे निर्विवाद सत्य आहे. मग प्रश्न पडतो, 'तेथे लेण्याद्रि गणपती आलाच कसा ?' अशीच न सुटलेली कोटी आपण नव्याने सोडवण्याची सामाजिक आणि ऐतिहासिक प्रबोधनाची गरज आहे. गौतमबुद्ध यांच्या जीवनतत्त्वज्ञानावर मी 'मराठी' व 'इंग्रजी' असे दोन ग्रंथ लिहिले आहेत. स्वामी विवेकानंदांचे चरित्र्य लिहिले आहे. छ. शिवाजी महाराजांचे ही चरित्र्य लिहिले आहे. हे तिन्ही महापुरूष बहुजन समाजातले आहेत. मग यांची मंदिरे यांच्या संस्था यांचे पोवाडे आणि चरित्र्य बहुजन समाजाच्या प्रभावाखाली अधिपत्याखाली नाहीत हे वास्तव आहे. धर्म तत्त्वज्ञान भाषा संस्कृती किंबहुना ज्ञानाच्या शाखा या स्वतःला ब्रह्माच्या मुखातून प्रकट झालेल्याचा अभिमान बाळगणाऱ्यांनीच आपल्याच कब्जात ठेवल्या यात शंका नाही. मालक आणि गुलाम असेच हे धार्मिक नाते त्यामुळे मालक आणि गुलाम असे दोन भाग पडतात आणि मग हे धर्माचे ठेकेदार बहुजन समाजाच्या नैसर्गिक न्यायाच्या हक्कावर गदा आणतात. समाज आणि शासन यांना मुर्ख बनवतात आणि देशातील धर्माच्या नांवावरच्या अफाट संपत्तीवरचे नाग बनून राहतात. देशातील पुरोगामी चळवळींनी या सामाजिक भ्रमाचा भोपळा प्रबोधनाच्या स्वरूपात फोडण्याची गरज आहे.

## सिंहवाहिनी अंबाबाई

करवीरच्या अंबाबाईची मूर्ती ही सिंहवाहिनी आहे. तिच्या मस्तकावर शिवलिंग आहे. मंदिरातील श्रीचक्र हे दगडावर कोरलेले आहे. जे भारतात जिथे जिथे शक्तीपीठे आहेत. तिथे तिथे श्रीचक्र उपासना होत असते. श्रृंगेरीची शारदांबा असो नाहीतर बदामीची बनशंकरी असो तेथे तेथे शिव आणि शक्तीच्या संगमातून सारे विश्व निर्माण झाले. असा तांत्रिक नकाशाच कोरलेला असतो. या श्रीविद्येचे उपासक श्री ललित सहस्त्रनाम, श्रीसुक्त, त्रिशती अशा विविध रूपात उपासना करीत असतात. त्यामुळे नवरात्रीमध्ये नवचंडिचे पाठ करताना दूर्गा सप्तशतीचे संपूर्ण तेरा अध्याय करणारे उपासक आहेत. कांही लोक श्रीदेवी कवच, कुंजिका आणि नवार्ण मंत्राचा जप करण्याचे अनुष्ठान करतात. नवरात्रीमध्ये तांत्रिक विधियुक्त यज्ञ करून प्राणिबळी किंवा कोहळा दिला जातो. दूर्गा ही महिषासुरमर्दिनी असल्यामुळे कांही ठिकाणी रेड्याचाही बळी दिला जातो. कलकत्ता, गोहत्ती (असाम) सारख्या तांत्रिक पीठांना मी भेट दिली आहे. तेथे अनेक प्रकारचे बळी आजही दिले जातात. आपल्या मुळ

विवेचनाकडे वळताना, कोल्हापुरच्या अंबाबाई हे तुळजा भवानीचे रूप असल्यामुळे अनेक तांत्रिक विधी आजही पाळले जातात. जुने जाणते लोक सांगतात की, 'यज्ञ आणि पशूबळी, मद्य आणि मांसाचा नैवेद्य दाखवला जातो. वर्षातून एक दिवस चक्रउपासनेचा तांत्रिकविधी पार पाडला जातो पण त्याची जाहीर वाच्यता कोणी करीत नाहीत.' कारण ती अंबाबाई आहे हे जळजळीत सत्य समाजापासून का लपवले जाते ?

कोल्हापूरची अंबाबाई ही राष्ट्रकुट, शालीवाहन, देवगिरीचे यादव, चालुक्य या साऱ्या मराठा सम्राटांची कुलदैवत आहे. ती मुळात युद्धदेवता आहे. त्यामुळे जी पोथी वापरली जाते ती शक्ती संप्रदायाची आहे.

करवीरच्या अंबाबाईची मुर्ती ही स्पष्टच दुर्गेची आहे हे पुराणवस्तु विभागाचे निवृत्त संचालकही मान्य करतात. पुजारीही मान्य करतात, छत्रपती घराणेही मान्य करते, जुने जाणते लोकही मान्य करतात. याच मंदिरातील सरस्वतीची मूर्ती ही सरस्वती नसून तिचा मुखवटा काढला तर दुर्गा आहे हे स्पष्ट होते आणि काली हे महिषासूरमर्दिनीचे स्वरूप आहे. त्यामुळे तिन्हीही मूर्ती या आंबेच्याच मूर्ती आहेत.

मग प्रश्न असा पडतो की, 'अंबाबाईचे रूपांतर महालक्ष्मी करण्याचे पाप कोणी आणि का केले. धर्मआज्ञेप्रमाणे हे करणाऱ्यांना कांही शाप लागतील का ? लागले आहेत का ? याचाही विचार अनेक भक्त करतात.

क्षत्रियांची महादेवाची, दुर्गेची मंदिरे साऱ्या समाजाला परंपरेनेच मुक्त आहेत. पांडुरंगाच्या मुर्तीला कोणीही स्पर्श करू शकतो. स्पर्शास्पर्श, सोवळेओवळे, चातुर्वण्य या कालबाह्य रूढी आहेत. अडीच हजार वर्षापूर्वी क्षत्रिय राजपुत्र गौतम बुद्धाने या रूढी मोडलेल्या आहेत. या परंपरा अमान्य केल्या आहेत. स्वतः छत्रपती शिवाजी महाराजांनी कृतीने दाखवले की, धार्मिक रूढी परंपरेच्या नांवाखालच्या शृंखला झुगारून द्या. समुद्रोल्लंघन पाप मानणाऱ्या धर्मपंडितांना त्यांनी दाखवले की, मराठ्यांचे आरमार स्थापून समुद्रातून जाऊन त्यांनी लढाया जिंकल्या, नेताजी पालकरांना पुन्हा हिंदू धर्मात घेतले. क्षत्रिय राहिलाच नाही म्हणणाऱ्यांना समजून दिले की, 'मी क्षत्रिय कुलावंतास आणि त्यांना गोब्राह्मण प्रतिपालक म्हणणाऱ्यांना चपराक दिली की, सर्व धर्माच्या लोकांना, सर्व जाती-जमातींना त्यांच्या आदर्श राज्यात स्थान होते.'

## मंदिराची गरज आहे ?

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे पिताजी प्रबोधनकार ठाकरे यांचे विचार रोखठोक, जहाल व सत्यशोधकी होते. त्यांचे देवळांचा धर्म आणि धर्माची देवळे हे

छोटे पुस्तक जवळजवळ शंभर वर्षांपूर्वीचे आहे, पण धर्माचा धंदा कसा चालतो यावरचे विचार आजही चिंतनीय आहे. त्यांची मिमांसा पाहू. ते म्हणतात, 'भटेतरांच्या धार्मिक गुलामगिरीच्या थोतांडात देवळांचा नंबर पहिला लागतो. देवळांची उत्पत्ती ब्रह्मदेवाच्या बारशाला खास झालेली नाही. हिंदू धर्माची ही अलीकडची कमाई होय. देऊळ वा देवालय या शब्दाचा अपभ्रंश आहे. देवाचे जे आलयवसतिस्थान ते देवालय. आमचे तत्त्वज्ञान पाहावे तो देव चराचर व्यापुनि आणखी वर दशांगुळे उरला अशा सर्वव्यापी देवाला चार भिंतींच्या आणि कळसबाज घुमटाच्या घरात येऊन राहण्याची जरूरीच काय पडली ? आजचा देवळातला थाट पाहिला तर जिवंत माणसाला एक वेळच्या कोरड्या भाकरीची पंचाईत, पण या देवांना सकाळची न्याहरी, दुपाची पंचपक्वान्नांचे भरगच्च ताट, पुन्हा तीन प्रहरी टिफीन आणि रात्री जेवण ! मनुस्मृती, पुराणे आणि देवळे असा तीन पेडी फास हिंदू समाजावर लटकला आहे. पुजारेतर दुनियेच्या उरावर या तीन प्राणघातक धोंडी आहेत. या नष्ट करा, जाळून खाक करा, कोट्यवधी हिंदू काय म्हणून देवळात जातात ?''

प्रबोधनकारांचे हे जहाल विचार, हे प्रश्न आपण स्वतःला विचारायला हवेत. या देवळांच्या शोषण व्यवस्थेत आजही बदल झालेला नाही. रोज नवी देवळे निर्माण होतात. ज्या पाथरवटांनी मूर्ती घटवल्या, त्यांना मूर्तीला स्पर्श करू द्यायचा नाही हा धार्मिक सांस्कृतिक दहशतवादच ठरतो. देवळे ही विशिष्ट वर्गाची वतनी, जहागिरी. त्यांच्याशिवाय देवळे नाहीत, त्यामुळेच देवांची संख्या लोकसंख्येच्या समप्रमाणात वाढत गेली. आज गरज आहे प्रबोधनाची. मंदिराऐवजी सार्वजनिक वाचनालये, संशोधन, वेधशाळा, दवाखाने, अनाथाश्रम, व्याख्यान, मंदिरे, तालीमखाने यावर बहुजन समाजाने पैसा खर्च करावा.

## व्यसनाधीन पुजारी

पावित्र्याच्या गोष्टी करणाऱ्या अनेक पुजाऱ्यांकडे देवळात दान, दक्षिणेरूपाने जमणारा काळा पैसा त्यांना व्यसनाधीन बनवीत आहे. तंबाखू, गुटखा, दारूसारख्या व्यसनांमुळे त्यांचे संसार शापित भूदेवांचे बनले आहेत. देवा शपथ खरं सांगतो अशी जाहीर कबुली देण्याची आता वेळ आली आहे. जर धर्माच्या नावावर कोट्यवधी रुपये दरवर्षी कोणी मिळवू लागला तर सर्वांना समान न्याय या अर्थाने आयकर खात्याने देव नि भक्तांच्या कृपेने व्यवसाय करणाऱ्यांवर धाडी टाकाव्यात. त्यांना व्यवसाय कर, नगरपालिका, महानगरपालिका यांचे व्यवसाय परवाना सक्तीचे व्हायला कांहीच हरकत नाही.

मंदिर संस्थेच्या मूळ कल्पनेत साहित्य, संगीत, शिल्प, चित्रकला, नाट्य, विज्ञान या रूपाने निष्काम सेवा होत होती. समाजातील सर्व थरांतील लोक तेथे एकत्र येत. नित्यनियमाने प्रार्थना, गायन, कथा, कीर्तने, शास्त्रीय सुसंवाद, बौधिक चालत. सार्वजनिक उत्सवाच्या निमित्ताने निरनिराळ्या क्षेत्रातील स्त्री-पुरुष एकत्र येत. अशा मंदिरातील पुजारीही चारित्र्यसंपन्न व निःस्वार्थी होते, त्यामुळे त्या त्या ठिकाणाला तीर्थस्थानांचा दर्जा प्राप्त झाला. पण पुढे मूठभर स्वार्थी लोकांनी संस्था भ्रष्ट केल्या. मंदिरांची स्वतःची जहागिरी बनवली. स्वातंत्र्यानंतर या जहागिऱ्याही राष्ट्रीय प्रवाहात विलीन करायला हव्यात. शिर्डी, तुळजापूर, पंढरपूरप्रमाणे करवीरच्या अंबाबाईचे मंदिरही शासनाने ताब्यात घ्यावे. आता ब्राह्मणेतरांनी मंदिरात जाण्यावर बहिष्कार घालावा. संहिता, श्रुती, स्मृती, पुराणे, ब्राह्मणे आणि धर्मपीठाधीश हे सारे मोडीत काढण्याची गरज आहे. धर्मचिकित्सा करताना बिळाला उंदीर साक्षी ठरतो. या बहुजनावर गुलामगिरी लादणाऱ्या चोपड्यांना आधार घेऊन रूढी लादायचा प्रकार होतो. ऋग्वेदातील पुरुषसुक्त हे चातुर्वण्याचे उगमस्थान आहे. ते ब्राह्मणेत्तरांनी का स्वीकारायचे ? स्वर्ग आणि नरकाच्या भीतीने ? गौतमबुद्धांनी एकाला प्रश्न विचारला, 'तू स्वर्ग पाहिला आहेस ? तुझ्या वाडवडिलांनी तरी ? पंचक्रोशीत राहणाऱ्या तुझ्या जातभाईंनी तरी ?' या प्रश्नाला नकारात्मक उत्तर आले. मग गौतम बुद्ध म्हणाले, 'जो स्वर्ग तुम्ही कोणीही पाहिला नाही, तेथे आम्हाला धाडणारे तुम्ही कोण ? तेंव्हा स्वर्ग व नरक येथेच आहे.' ती एक कपोलकल्पित पिढ्यान्‌पिढ्या माथी मारलेली थाप आहे. हे थापा मारणारे कधीही स्वतः श्राद्ध घालीत नाहीत वा सत्यनारायणही घालणार नाहीत.

## अंबाबाईचे रूपांतर महालक्ष्मीत ?

पूर्वापार हे दुर्गा मंदिर अंबाबाई या नांवाने प्रसिद्ध आहे. एका कॅलेंडर कंपनीच्या प्रसिद्धीनंतर पैसा देणारी, समृद्धी आणणारी देवी असा जाणीवपूर्वक प्रचार करण्यासाठी शिवपत्नी अंबेला विष्णुपत्नी लक्ष्मी बनवले. महाप्रसाद, महामंडळ तसाच महालक्ष्मी हा शब्दप्रयोग रूढ करण्यात आला, माथी मारण्यात आला. क्षत्रियांच्या युद्धदेवतेला हरिप्रिया बनवले. त्या महाप्रयोगात तिरूपतीचे पुजारीही सामील झाले. तेथून शालू येऊ लागला. नागबळीचे कर्मकांड करायला नाशिकच्या कर्मकांडाची एजन्सी मिळते तोच प्रकार. नाग नांवाच्या भारतातील दलित, गरीब आदिवासींना पूर्वी यज्ञातही बळी देत. तोच प्रकार पूजारूपाने चालू आहे. नाग लोकांच्या वस्तीवरून नागपूर हे नाव पडले. तेथल्या नदीचे नांव नाग आहे. टेकडीचे नाव नागार्जून टेकडी आहे.

तेंव्हा सहजतेने शिवाच्या पत्नीला विष्णुपत्नी करणे हा बहुजनांच्या भक्तीशी, श्रद्धेशी खेळ आहे, सांस्कृतिक दहशतवाद आहे. याविरुद्ध जनजागृतीची गरज आहे. मंगळवार, शुक्रवार देवीचा, सोमवार शिवाचा, गुरुवार दत्ताचा, शनिवार मारुतीचा ही वाटणी कोणी केली ? आणि कशासाठी ? या देवाला नवस, दान, दक्षिणा कोण मागते? या साऱ्या प्रश्नांची उत्तरे स्वामी विवेकानंदांनी शंभर वर्षांपूर्वीच दिली आहेत. 'खरा धर्म मंदिरात, धार्मिक उत्सवात नसून व्यक्तींच्या प्रामाणिक आणि पवित्र हृदयात आहे', या संदेशाचा गांभीर्याने विचार केला तर देवीचा जागर साजरा होईल. गोंधळ घालणारे शांत होतील.

## पुराणावर विश्वास ठेवू नका.

पुराणातील भक्तिमार्गाचे महात्म्य कमी होऊन कर्मकांडाचे स्वरूप आहे. निर्गुण, निराकाराचे ध्यान करता येत नाही म्हणून सगुण मूर्तीचा आश्रय घ्यावा असे पुजाऱ्यांनी सांगितले पण त्याचे त्यांनी अवडंबर माजवले. प्रत्येक देवतेचा वार, तिच्या आवडी निवडी ठरल्या. फुले, नैवेद्य, अभिषेक, प्रदक्षिणा ठरवल्या. त्यावर ग्रंथ रचले. या धार्मिक विधित जर कोठे चुकले तर देवाचा कोप होईल अशी धमकीवजा सूचना सर्वसामान्य भक्तांच्या मनात ठसवली. त्यामुळे देवी- देवतांचे राग-लोभ ठरवणारे धार्मिक विधी पक्के झाले मग देवाच्या नावावर भोग-विलास सुरू झाले. त्यातच पुजारी आणि मंदिरे, बाबा, महाराज, ताई महाराज रमून गेले. त्यामुळे धर्माचा धंदा जोरात फोफावला.

## चिकित्सा करा

धार्मिक स्थान, उत्सव आणि विधी यात पुजारी लोकांची मिरासदारी होऊन सर्वसामान्य भक्त खऱ्या धर्मापासून आणि देवापासून दूर राहिला. भक्तिभाव हा मूर्तिपूजेचा खरा गाभा ते स्वरूप जाऊन व्रत वैकल्ये, उद्यापने, प्रायश्चित्ते, उपासतापास यांनाही बुवाबाजीचे स्वरूप आले. त्यांनी ताळतंत्र सोडला आहे. स्वत:च नीतितत्त्वाची पायमल्ली केली. चारित्र्य, मनोनिग्रह यांना फाटा दिला. त्यामुळे धार्मिक स्थान, उत्सव किंवा विधी यात खरा धर्म राहिलेला नाही हे सत्य आहे.

दहा वर्षे, पाच धर्मातील दोन हजार लोकांना भेटलो. आठ राज्यात फिरून पाचशे भक्तांच्या मी मुलाखती घेतल्या त्यावर संशोधनात्मक निधर्मी नैतिकता हा ग्रंथ मी प्रकाशीत केला. त्याला प्रस्तावना लिहिताना ज्येष्ठ कम्युनिष्ट नेते ॲड. गोविंद पानसरे म्हणतात, ''सध्या धर्माचे काम समाजधारणा पण सध्या धर्माच्या नावावर जे चालू आहे ते विकृत, किळसवाणे, ओंगळवाणे आणि एका समाजाच्या स्वार्थासाठी

चालू आहे. हेतुपूर्वक चालू आहे. हा हेतू दुष्ट आहे. धर्माच्या रूपाने मिळणाऱ्या काल्पनिक सुखातून पिडिताना बाहेर काढल्याशिवाय खरे सुख मिळणार नाही. डॉ. सुभाष के. देसाई यांच्या पुस्तिकेचा मी एवढ्यासाठी पुरस्कार करतो की हे पुस्तक वाचकांना चिकित्सा करायला प्रवृत्त करू शकेल. धर्माचीही चिकित्सा करायला पाहिजे. भ्रमावर आधारलेली परंतु वास्तवात परिणाम करणारी धर्म-देव- नरक या जाणिवांची चिकित्सा व्हायला हवी.''

## कायदा काय सांगतो ?

**IPC २९५ कलम काय सांगते.**

या कलमामध्ये जो कोणी लोकांच्या दृष्टीने पवित्र मानली गेलेली वस्तू किंवा पूजेचे स्थानाचे नुकसान करेल, उद्ध्वस्त करेल तर तो गुन्हा होतो याचा विचार केला आहे. यातील महत्त्वाचा भाग म्हणजे या कृतीमागचा उद्देश अशा विध्वंसापासून किंवा नुकसानीतून लोकांच्या धार्मिक भावना दुखावल्या तर तो गुन्हा ठरतो आणि त्याला दोन वर्षांची शिक्षा आणि तुरुंगवास होऊ शकतो.

***- डॉ. सुभाष के. देसाई***

*११ ब, शिवाजी स्टेडियम, कोल्हापूर. मो. ९४२३०३९९२९.*

*(ही पुस्तिका समाज प्रबोधनासाठी सिंहवाणी प्रिंटर्स, शिवाजी स्टेडियम, कोल्हापूर येथे छापून ॲडव्होकेट नरेश नारायण पाटील यांनी प्रसिद्ध केली.)*

***ही विष्णुपत्नी नाही त्यामुळे तिरूपतीचा शालूची भीक मागण्याचे बंद करा.***

***सरस्वती व काली नाहीत त्या महिषासुरमर्दिनी आहेत हे सत्य मान्य करा.***

श्री अंबाबाई ही स्त्री देवता आहे. तिला स्नान घालणे, वस्त्रालंकार घालणे ही कामे स्त्रीयांनीच करायला सुरुवात करावी.

'भारतातील मंदिरातील करोडोंची संपत्ती बाहेर काढली तर बहुजन समाजाच्या कल्याणाच्या अनेक योजना हिंदुस्थानात राबवता येतील.' असे स्वामी विवेकनंदांनी शंभर वर्षापूर्वी सांगीतले. ते केव्हां प्रत्यक्षात येणार ?

श्रीक्षेत्र पंढरपूरच्या मंदिराप्रमाणे श्रीअंबाबाई मंदिरातील भक्त आणि देवता मधिल दलाल हटवा नि मंदिराचे उत्पन्न कितीतरी पट वाढेल त्याचा वापर भक्तासाठी करावा अशी लाखों भक्तांची मागणी आहे.

# श्री यंत्र




श्री अंबाबाई मंदिरात गाभाऱ्याकडे जाताना डाव्या बाजूला श्री यंत्र आहे. हे बदामीच्या बनशंकरी मंदिरातही आहे. **शिव–शक्ति संगमाचे हे तांत्रिक यंत्र.**

**श्री अंबाबाई मंदिरातील 'काली' हे महिषासूरमर्दिनीचे शिल्प**

**चांदीचा मुखवटा काढा नि पहा रेड्याचा वध करणारी, एक पाय रेड्याच्या मस्तकावर ठेवून त्याची जीभ ओढणारी महिषासूरमर्दिनी आहे.**

**नरमुंड धारण केलेली शिवाच्या शक्तिहीन**
**(शिव – 'इ'कार म्हणजे शक्ति = शव) देहावर नाचणारी ती काली नाही.**

**मूल्य ५ रुपये**